# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

२३५ पेनिनसुला हाऊस, तिसरा मजला, डॉ.दादाभाई नौराजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
मोबाईल क्र. ८४२२०६८६५८, ९८९२४८३१७८
E-mail :-mail@mchmumbai.org Web site:www.mchmumbai.org


## महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी चिकित्सकांच्या दारी "होमिओ महामेळावा २०२४"

होमिओपॅथी सल्लागार समिती महाराष्ट्र शासन , राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग, नवी दिल्ली आणि महिला होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, सोलापूर यांच्या सहकार्याने ४० वर्षात प्रथमच

### महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, मुंबई द्वारा आयोजित महा होमिओ मेळावा २०२४

पूर्व नोंदणी आवश्यक . त्याकरिता महिला होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, सोलापूर Website - www.mahilahomoeopathiccollege.com वरील गुगल फॉर्म भरावा व त्याचा स्क्रिन शॉट (Screen Shot) ई-मेल - pspmmhmc2013@gmail.com वर दि. ३ मार्च २०२४ सायंकाळी ५.०० पर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचा दिनांक :- दि. ९ मार्च २०२४ व दि. १० मार्च २०२४

कार्यक्रमाचे ठिकाण :- कर्मयोगी आप्पासाहेब काडादी सांस्कृतिक भवन, JW8R+96 Q , सिध्देश्वर साखर कारखान्याजवळ, एअरपोर्ट विभाग, शंकर नगर, सोलापूर

वेळ :- सकाळी ९ ते सायं. ५.०० पर्यंत

कार्यक्रमाची उद्दिष्टे-

१) राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग, नियम व विनियम यांची माहिती प्रत्यक्ष आयोगाच्या पदाधिकाऱ्यांद्वारा करुन देणे.

२) नामवंत होमिओपॅथीक व्याख्यात्यांद्वारा सर्वांसाठी होमिओपॅथी, सुलभ होमिओपॅथी या करिता व्याख्याने

३) महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद व होमिओपॅथी सल्लागार समिती, महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे नोंदणीकृत चिकित्सकांच्या अडचणी दूर व्हाव्यात याकरिता चालू असलेले काम व त्या अनुषंगाने उपस्थित चिकित्सकांशी संवाद

ठिकाण - मुंबई
दि.- ६ फेब्रुवारी २०२४

डॉ. विलास हरपाळे
प्रशासक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY • MUMBAI •

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

**२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,**
**फोर्ट, मुंबई ४००००१**
**मोबाईल ८४२२०६८६५८/९८९२४८३१७८**

E-mail : mail@mchmumbai.org Website - www.mchmumbai.org


## सूचना

सर्व नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना कळविण्यात येते की, डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्कार सन २०२३-२४ व सन २०२४-२५ करिता जारी केलेले नियम व निकषानुसार पात्र उमेदवारांचे नामांकनाचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक व्यक्तींनी परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दि. ७ मार्च २०२४ साय. ५.३० पर्यंत प्रस्ताव सादर करावेत. डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्कारांकरिता खालीलप्रमाणे निकष व नियम राहतील.

**निकष -**

१) डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्काराकरिता होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडे पंजीकृत असणे आवश्यक असून तो कसूरदार नसावा.
२) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक महाराष्ट्र राज्यात किमान २० वर्षे वैद्यकीय व्यवसायात सेवारत असावा.
३) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक मुंबई समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम १९५९ अन्वये तयार केलेल्या नितीमत्ता व आचार संहिते मधील तरतूदी अन्वये दोषी ठरलेला नसावा किंवा भारतीय दंड विधान संहितेनुसार दंडीत झालेला नसावा.
४) पुरस्काराकरिता नामांकन प्राप्त झालेल्या होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकाचे महाराष्ट्र राज्यात होमिओपॅथीचा प्रचार, प्रसार, विकास, शिक्षण व संशोधन यापैकी किमान एका क्षेत्रात मौलिक योगदान असावे.
५) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकाने सामाजिक क्षेत्रात केलेले काम व त्याकरिता शासकीय, निमशासकीय किंवा नामवंत नोंदणीकृत संस्थांकडून प्राप्त झालेले पुरस्कार ही अतिरिक्त गुणवत्ता समजली जाईल.

**नियम** - १) परिषदेने जाहिर केलेल्या पुरस्कारांना परिषदेचे संकेतस्थळ व वृत्तपत्रीय बातम्यांद्वारे प्रसिध्दी देण्यात येईल.
२) पुरस्कार प्राप्त व्यक्तींना त्या संबंधीची सूचना स्वतंत्रपणे परिषदेतर्फे दिली जाईल.
३) पुरस्काराचे वितरण, परिषदेने निश्चित केलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या सोयीनुसार वर्ष समाप्तीच्या अगोदर केले जाईल.
४) पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा परिषदेतर्फे पुरस्कार प्रमाणपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव केला जाईल.
५) पुरस्कार विजेत्यांना पुरस्कार वितरण सोहळयाकरिता येण्या-जाण्या करिता शासनाच्या वर्ग-१ अधिकाऱ्याला लागू असलेल्या शासकीय नियमाप्रमाणे प्रवासभत्ता देण्यात येईल.

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY MUMBAI

ठिकाण - मुंबई
दि.- ६ फेब्रुवारी २०२४

**डॉ. विलास हरपाळे**
**प्रशासक**
**महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी**

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

**२३५ पेनिनसुला हाऊस, तिसरा मजला, डॉ.दादाभाई नौराजी रोड,**
**फोर्ट, मुंबई ४००००१**

मोबाईल ८४२२०६८६५८/९८९२४८३१७८

फोन २२७०४४००,२२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६

**E-mail - mail@mchmumbai.org** **Web site:www.mchmumbai.org**


.................................................................................................................

## जाहिर निविदा

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद मुंबई या विधीमंडळ अधिनियमाप्रमाणे स्थापित स्वायत्त संस्थेला आपल्या मुंबईस्थित कार्यालयाकरिता बांधून वापरण्याकरिता तयार असलेली अंदाजे २,५०० ते ६,००० स्वे. फूट जागा मालकी हक्काने खरेदी करण्यासाठी दि. १७ जानेवारी २०२४ रोजीच्या जाहिर सूचनेद्वारे योग्य रित्या भरलेली निविदा आवश्यक ती सर्व कागदपत्रे किंवा कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह परिषदेच्या कार्यालयात दि. ३१ जानेवारी २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु सदरची मुदत दि. ३१ जानेवारी २०२४ पासून दि. १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तरी इच्छूक ठेकेदारांनी दि. १५ फेब्रुवारी २०२४ सायंकाळी ६.०० पर्यंत सीलबंद लखोटयात सादर कराव्यात. सदर निविदांबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार परिषद राखून ठेवत आहे.

ठिकाण - मुंबई
दि.- ६ फेब्रुवारी २०२४

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY • MUMBAI •

डॉ. विलास हरपाळे
प्रशासक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी
मुंबई -१